## २) फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे जे ज्या मतदारसंघाचे मतदार नाहीत त्यांनी त्या मतदार संघात न थांबणेबाबत आदेश.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग, पत्र क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.८/का-८ दिनांक ०९/११/२०२२ रोजीच्या प्रसिध्दीप्रत्रकान्वये ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मीत तसेच समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसल्यामुळे मागील निवडणुकांमधून वगळलेल्या अशा सुमारे ७७५१ ग्रामपंचायतींसाठी (सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या) सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील १२ ग्रामपंचातीची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून त्यामध्ये चाकण पोलीस स्टेशन अंतर्गत- ०६, तळेगाव एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत - ०१, शिरगाव पोलीस स्टेशन अंतर्गत-०२ व महाळुंगे पोलीस चौकी अंतर्गत ०३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. त्याची आचारसंहिता दिनांक १८/११/२०२२ रोजीपासून सुरु होवून निवडणुकीचा निकाल जाहीर होई पर्यत अस्तित्वात राहील. दिनांक १८/१२/२०२२ रोजी मतदान होणार असून, दिनांक २०/१२/२०२२ रोजी मतमोजणी होणार आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील निवडणूक होणाऱ्या एकुण १२ ग्रामपंचायतीपैकी ०२ (शिरगाव व येलवाडी) ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक बिनविरोध झाल्याने उर्वरीत १० ग्रामपंचायतींत एकुण ११ मतदान केंद्र व ३१ मतदान बुथचा समावेश आहे.

निवडणूक आयोग, भारत सरकार यांचेकडील पत्र क्रमांक ४६४/आय.एन. एस.टी./ २००७/ पी.एल.एन.-१/ दिनांक ०८/०१/२००७ व दिनांक २७/०२/२००७ अन्वये प्रचार संपल्यानंतरच्या वेळेपासून मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राजकीय व्यक्ती जर ते त्या ग्रामपंचायतीचे मतदार नसतील तर त्या ग्रामपंचायत हदीत थांबणेबाबत प्रतिबंध करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी सर्व राजकीय व्यक्तींना किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ते ज्या निवडणुक होणाऱ्या ग्रामपंचायतीचे मतदार नाहीत त्यांना त्या ग्रामपंचायत हदीत थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात निवडणूक होणाऱ्या १० ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्रात दिनांक १६/१२/२०२२ रोजी १६/०० वा. पासून ते दिनांक १८/१२/२०२२ रोजीचे २४/०० वा. पर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

सर्व राजकीय व्यक्ती किंवा राजकीय पक्षाशी संबंधीत कोणतीही व्यक्ती ते ज्या निवडणुक होणाऱ्या ग्रामपंचायतीचे मतदार नाहीत त्यांना त्या ग्रामपंचयात हदीत थांबणेस/वास्तव्य करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.सं.कलम १८८ अन्वये कारवाईस पात्र राहील.

**सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक १५/१२/२०२२ रोजी देणेत आला आहे.**

Scanned with CamScanner